FORM-1A N.C.R.B.

I.I.F.-I

# पहिली खबर

# FIRST INFORMATION REPORT 0154172

फौजदारी प्रक्रिया संहितेच्या कलम १५४ अन्वये (Under Section 154 Cr. P.C.)

1. राज्य State महाराष्ट्र, जिल्हा District मुंबई, पोलीस ठाणे Police Station ला.प्र.वि. मुंबई, पहिली खबर क्र. FIR No. १४, वर्ष Year २०२१, दिनांक Date १३/०३/२०२१
2. (i) अधिनियम Act भ्रष्टाचार प्रति. अधि. १९८८, कलमे Sections ७
   (ii) अधिनियम Act ......, कलमे Sections ......
   (iii) इतर अधिनियम व कलमे Other Acts and Sections ......
3. (a) अपराधाची घटना : वार Occurrence of offence : Day शुक्रवार, तारीख पासून Date from १२/०३/२१ वेळ Time १३.१५ वा., तारीख पर्यंत Date to ......, वेळ Time ......
   वेळेचा अवधी (प्रहर) (योग्य ठिकाणी ✓ अशी खूण करा) (Tick applicable portion).
   (1) 00.00 ते 03.00 (2) 03.00 ते 06.00 (3) 06.00 ते 09.00 (4) 09.00 ते 12.00 (5) 12.00 ते 15.00
   (6) 15.00 ते 18.00 (7) 18.00 ते 21.00 (8) 21.00 ते 24.00 (9) 06.00 ते 18.00 (5) 18.00 ते 06.00
   (b) पो. ठा. ला माहिती मिळाल्याची Information received at P. S. तारीख Date १०/०३/२१, वेळ Time ११.३० वा.
   (c) गुन्हा दाखल झालेचा सर्वसाधारण स्टेशन डायरीचा नोंद क्र. General Diary Reference : Entry No. ०१/२१, तारीख Date १३/०३/२१ वेळ Time ००.२५ वा.
4. माहितीचा प्रकार Type of Information (लाचेच्या मागणी संदर्भात) लेखी / तोंडी Written / Oral लेखी
5. गुन्हा घडल्याचे ठिकाण (a) पोलीस ठाण्यांपासून अंतर व दिशा ......, चौकी / बीट / दूरक्षेत्र नाव व क्र. ......
   Place of Occurrence : (a) Direction and distance from P. S. Chouki / Beat / O.P. Name and No.
   (b) गुन्हा घडल्याचे ठिकाणाचे नाव Address of Occurrence Name, ठिकाणाचे क्रमांक No. if any, वार्ड Ward, रस्त्याचे नाव Name of road: सहा. अभियंता, (जलकामे) ए विभाग, जलमापक कार्यविभाग, जलदेयक विभाग, ६ वा मजला, ए वॉर्ड, बृहन्मुंबई
   जवळचे ओळख चिन्ह / ठिकाण Nearest identifiable place, गाव Village, पोस्ट Post, तालुका Taluka, जिल्हा Dist., राज्य State: महानगर पालिका, शहिद भगतसिंग रोड, फोर्ट, मुंबई-०१
   (c) पोलीस ठाणेचे हद्दीबाहेर असल्यास त्या पो.स्टे.चे नाव In case, outside the limit of this Police Station ......, तालुका Taluka ......, जिल्हा Dist. ......, राज्य State ......
6. तक्रारदार / खबर देणाराचे नाव व पत्ता Complainant / Informant : Permanent Address.
   (a) नाव Name श्री. विजय जाधव (b) वडिलांचे / पतीचे नाव Father's / Husband's Name श्री. रघुनाथ जाधव
   (c) जन्म तारीख व वय Date of Birth and Age ५५ वर्षे (d) राष्ट्रीयत्व Nationality भारतीय फोन नं. Phone No. ९८३३३९५६५३
   (e) पारपत्र क्रमांक Passport No. ......, दिल्याचा दिनांक Date of Issue ......, दिल्याचे ठिकाण Place of Issue ...... (f) व्यवसाय Occupation नोकरी
   (g) धर्म Religion हिं., जात Caste ......, जनजात Sub-Caste ......
   (h) पत्ता Address : गल्ली / सर्व्हे नं. Ward, घर / नाव नं. House/Name No., फोन / मो. नं. Phone/Mo. No., पॅन नं. PAN No., गटर्स नं. Card No.: रूम नं. ०६, श्री गणेश साईकृपा चाळ, नरेंद्र कम्पाऊंड,
   रस्त्याचे नाव Road, जवळचे प्रसिद्ध ठिकाण Nearest identifiable place, गाव Village, पोस्ट Post, पो.स्टे. P. Stn.: बंदर पाखाडी रोड, गणेशनगर वाडी, कांदिवली प. मुंबई. ६७
   तालुका Taluka ......, जिल्हा Dist. ......, राज्य State ......, सध्याचा पत्ता Present Address ......
7. माहिती असलेल्या आरोपीचे संपूर्ण नाव व पत्ता (आवश्यक असल्यास स्वतंत्र कागद जोडावा.) (संशयिताचे वर्णन प्र. ख. रिपोर्टच्या फॉर्म 1-B दर वेगळ्या शिटवर घेऊन तपासिक अंमलदाराच्या प्रथम खबरीला व सं. अभियोक्ता यांच्या फाईलला जोडावे.)
   Details Name and Address of known Accused (Attach separate sheet, if necessary.) (If suspect particular of physical feature write on form 1-B of attach FIR 1-B to Case Diary.)

(५ मजला)
श्री. संदिप ज्ञानदेव पन्हाळकर, वय ३८ वर्षे, व्यवसाय-नोकरी: नेमणूक - सहा. अभियंता (जलकामे) ए विभाग, ६ वा माळा, ए वॉर्ड, बृहन्मुंबई महानगर पालिका, फोर्ट, मुंबई. ०१

Y.P.P.–800 Reg.–(25×6=150 Lvs.)–2-2018–PA3–(K) 829

रा.ठि. रूम नं. १०, महेश को-हा. सोसा. प्रेमालनगर, काजुपाडा पाईपलाईन, जरीमरी, उमेश्वरी मंदिराजवळ, साकीनाका, मुंबई ७२

Scanned with CamScanner

यातील फिर्यादी श्री विजय रघुनाथ जाधव, वय ५५ वर्षे, धंदा-नोकरी, रा.ठि. रुम नं.०६, श्री गणेश साईकृपा चाळ, वर्दे, कुपाकंड, बंदर पाकाडी रोड, दापुगर वाडी, कांदिवली प. मुंबई ६७ यांच्या स्वतंत्र पानावर संगणकावर मराठीत टंकलिखित केलेला जबाब हाच नमुद गुन्ह्याच्या प्रथम खबरी अहवाल समजण्यात येत आहे.

समक्ष

(सही)

(अमोल वाघमारे)

पोलीस निरीक्षक

गु. प्र. शा. मुंबई

(सही)

(विजय र. जाधव)

जबाब दि. १२/०३/२०२१

श्री. विजय रघुनाथ जाधव, वय ५५ वर्ष, धंदा- सोसायटी मॅनेजर, रा.ठी.- रू.क्र.६, श्री गणेश साईकृपा चाळ, वर्पे कंपाऊंड, बंदरपाखाडी रोड, ढाणुकरवाडी, कांदिवली (प), मुंबई ४०० ०६७, मो. क्र. ८३५६९७७५६९

----•----

मी वरीलप्रमाणे असुन उपरोक्त नमुद पत्त्यावर माझे कुटूंबासह रहावयास आहे. मी मेकर आर्केड को.ऑ. सोसा. लिमि.८५, कफ परेड, कुलाबा, मुंबई येथील सोसायटीत मॅनेजर म्हणुन काम करीत असुन त्यातुन मिळणारे उत्पन्नावर माझे कुटूंबाचा उदरनिर्वाह करतो.

मी दिनांक ०९/०३/२०२१ रोजी मेकर आर्केड शॉपिंग सेंटर, कफ परेड, मुंबई येथील ऑफीस मध्ये असताना बुहन्मुंबई महानगरपालिका, अे वॉर्ड, फोर्ट, मुंबई येथील वॉटर डिपार्टमेंट मधील अधिकारी संदीप (पुर्ण नाव माहित नाही) हे माझेकडे आले व मेकर आर्केड को.ऑ.सोसा. लिमि.८५, कफ परेड, कुलाबा, मुंबई येथील शॉपिंग सेंटरमधील श्री. हरीष लक्ष्मण भागचंदाणी यांच्या लक्ष्मण फास्ट फुड शॉपचा, वॉटर रीडींग मीटर क्र. ०००२६८ बऱ्याच दिवसापासुन बंद असल्याने त्यांच्या दुकानावर नोटीस काढुन त्यांना सुमारे २,००,०००/- रूपये दंड भरावा लागेल असे मला सांगितले. त्यावर मी त्यांना लॉकडाऊन मुळे शॉपींग सेंटर मधील दुकाने बंद असल्याने दुकानदारांचे नुकसान झाले आहे त्यामुळे एवढे पैसे भरणे कोणालाही शक्य होणार नाही असे सांगितले. त्यावर श्री.संदीप यांनी नमुद दुकानदारास नोटीस बजावणी व दंडाची कारवाई करावयाची नसल्यास त्यांना रू.१,००,०००/- दयावे लागतील अन्यथा त्यांचे पाण्याचे कनेक्शन तोडण्यात येईल असे मला सांगितले.

वॉटर डिपार्टमेंट, अे वॉर्ड, बुहन्मुंबई महानगरपालिका, फोर्ट, मुंबई येथील कार्यालयातील श्री. संदिप यांना लाचेची रक्कम देण्याची माझी इच्छा नसल्याने मी लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, मुंबई येथे दिनांक १०/०३/२०२१ रोजी समक्ष हजर राहून लाप्रवि मुंबई कार्यालयातील वरिष्ठ अधिकारी यांना भेटलो. वरिष्ठांनी दिलेल्या सुचनांप्रमाणे पो. नि. वाघमारे यांना भेटलो असता त्यांनी वॉटर डिपार्टमेंट, अे वॉर्ड, बुहन्मुंबई महानगरपालिका, फोर्ट, मुंबई या कार्यालयातील श्री. संदीप हे लाचेची मागणी करीत असल्याबाबत माझा लेखी तक्रार अर्ज स्वहस्तक्षरात लिहून घेतला व त्यावर माझी सही घेतली. बृहन्मुंबई महानगरपालिका, 'अे वॉर्ड, फोर्ट, मुंबई, यांच्या कार्यालयाची वेळ संपत आल्याने पो.नि. वाघमारे यांनी माझे अर्जावर दिनांक १२/०३/२०२१ रोजी कारवाई करण्यात येईल असे सांगुन मला दिनांक १२/०३/२०२१ रोजी लाप्रवि कार्यालयात सकाळी १०.०० वाजता येण्यास सांगितले.

पो.नि. वाघमारे यांनी सांगितल्याप्रमाणे मी दि. १२/०३/२०२१ रोजी लाचलूचपत प्रतिबंधक विभाग, मुंबई येथील कार्यालायात सकाळी १०.०० वाजता हजर झालो. सदर वेळी स.पो.आ गोरडे व दोन पंच ला.प्र.वि. मुंबई कार्यालयात हजर होते. त्यानंतर पोनि वाघमारे यांनी दोन शासकीय पंचांशी व सपोआ गोरडे यांचेशी माझी ओळख करून दिली. त्यानंतर पो.नि. वाघमारे यांनी पंचांना थोडक्यात हकिकत सांगून मी दिनांक १०/०३/२०२१ रोजी केलेला तक्रार अर्ज पंचांना वाचण्यास दिला. पो.नि. वाघमारे यांचे सुचनेवरून सदरच्या तक्रार अर्जावर दोन शासकीय पंचांनी स्वाक्षरी करून पो.नि. वाघमारे यांनी स्वतः स्वाक्षरी करून तक्रार अर्ज स्वतःचे ताब्यात ठेवला.

त्यानंतर पो.नि वाघमारे यांनी दिनांक १२/०३/२०२१ रोजी पंचांसमक्ष बृहन्मुंबई महानगरपालिका, 'अे वॉर्ड, फोर्ट, मुंबई येथील कार्यालयाच्या ठिकाणी माझे तक्रारीच्या अनुषंगाने पडताळणी करण्यात येणार असल्याचे सांगितले. पडताळणी दरम्यान माझे शर्टाच्या आतील बनियनला डिजीटल व्हाईस रेकॉर्डर लावण्यात येणार असुन होणारे संभाषण ध्वनीमुद्रीत करण्यात येणार असल्याचे मला सांगितले.

पो.नि. वाघमारे यांनी माझी पडताळणी पथकाची ओळख करून दिली. त्यानंतर आम्ही ला.प्र.वि. कार्यालयातून पोलीस पथकासह शासकिय वाहनाने निघून मुंबई पोर्ट ट्रस्ट, फोर्ट, मुंबई येथे थांबलो. त्यानंतर मला पो.नि.वाघमारे यांनी श्री. संदीप यांचे बृहन्मुंबई महानगरपालिका, अे वॉर्ड, फोर्ट, मुंबई कार्यालयात पडताळणीकरीता डिजीटल रेकॉर्डर

Scanned with CamScanner

चालू करून शर्टाचे आतील बनियनला लावून पंच श्री. देशमुख यांचे सह पाठविले असता श्री. संदीप यांची भेट झाली. त्यावेळी श्री. संदीप यांचेशी कामासंदर्भात व पैशांबाबत चर्चा झाली.

त्यानंतर मी पुन्हा मुंबई पोर्ट ट्रस्ट, फोर्ट, मुंबई येथे उभ्या असलेल्या पोलीस वाहनाजवळ आलो असता पोनि वाघमारे यांनी व्हाईस रेकॉर्डर काढून झालेल्या संभाषणाची हकीकत विचारून व्हाईस रेकॉर्डरमधील संभाषण ऐकुण लोकसेवक यांची पडताळणी दरम्यान लाचेची मागणी मध्ये परिपुर्ण रक्कमेचा आकडा न आल्याने व पावतीचा उल्लेख न आल्याने पो.नि वाघमारे यांनी पुन्हा पडताळणी करण्याचे ठरविले.

त्यानंतर काहि वेळानंतर पो.नि.वाघमारे यांनी मला पुन्हा श्री. संदीप यांचे बृहन्मुंबई महानगरपालिका, अे वॉर्ड, फोर्ट, मुंबई येथील कार्यालयात पडताळणीकरीता डिजीटल रेकॉर्डर चालू करून शर्टाचे आतील बनियनला लावून पंच श्री. देशमुख यांचे सह पाठविले. श्री. संदीप यांची भेट झाली व पुन्हा कामसंदर्भात चर्चा झाली व तडजोडीअंती रू. ३५,०००/- लाचेची रक्कमेची स्पष्ट मागणी केली असता मी त्यांच्याकडे पैशाची व्यवस्था करण्याकरीता वेळ मागुन घेतला.

त्यानंतर मी पुन्हा मुंबई पोर्ट ट्रस्ट, फोर्ट, मुंबई येथे उभ्या असलेल्या पोलीस वाहनाजवळ आलो. पो.नि. वाघमारे यांनी व्हाईस रेकॉर्डर काढून झालेल्या संभाषणाची हकीकत विचारून व्हाईस रेकॉर्डरमधील संभाषण पंचासमक्ष ऐकले. लोकसेवक श्री. संदीप याने पडताळणी दरम्यान लाचेची मागणी केल्याचे निष्पन्न झाले. लोकसेवक याने लाचेची रक्कम तात्काळ मागणी केली असल्याने त्वरीत सापळा कारवाई करावयाची आहे, त्याप्रमाणे मला सापळा कारवाईच्या वेळी घ्यावयाच्या दक्षतेबाबतच्या सुचना पो.नि.वाघमारे यांनी दिल्या तसेच लाचेच्या रक्कमेबाबत विचारणा केली असता मी मेकर आर्केड को.ऑ.सोसा. लिमि.८५, कफ परेड, कुलाबा, मुंबई येथील सोसायटीचे सेक्रेटरी श्री. अशोक पटेल यांनी सोसायटीच्या बँक खात्यामधुन रू.५०,०००/- काढून मला दिलेले आहे त्यापैकी लाचेकरीता लागणारे रू. ३५,०००/- ( रू. ५०० दराच्या ७० भारतीय चलनी नोटा) ही मी पो.नि. वाघमारे यांना दिली असता त्यांनी सदरची रक्कम ही सफेद रंगाच्या लिफाफ्यात ठेवत असलेबाबत मला सांगीतले. त्याप्रमणे पो.नि. वाघमारे यांनी सदर पांढऱ्या रंगाच्या लिफाफ्यास व नोटांना अँथ्रासीन पावडर लावण्यात येणार असल्याचे सांगुन अँथ्रासीन पावडरचे गुणधर्म समजावुन सांगितले. पो.नि. वाघमारे यांनी लोकसेवक यांनी लाचेची रक्कम स्विकारल्यानंतर मला माझे उजवा हात वर करून अंगठयाने थम दाखवुन पुर्वनियोजीत इशारा करावा असे सांगितले. त्यावेळी पोलीस पथक हे कोणास संशय येणार नाही असे थांबून पुर्वनियोजीत इशारा मिळताच लोकसेवक यांस रंगेहात पकडतील असे सांगितले.

त्यानंतर मुंबई पोर्ट ट्रस्ट, फोर्ट, मुंबई येथे पोलीस वाहनात पंचासमक्ष लाचेच्या रक्कमेस ॲथ्रासीन पावडर लावून सदरची रक्कम एका पांढऱ्या रंगाच्या लिफाफ्यात ठेवून लिफाफ्यास वरून ॲथ्रासीन पावडर लावली व पैशाचा लिफाफा माझ्या पँटच्या उजव्या खिशात ठेवला. पो.नि. वाघमारे यांनी माझे शर्टाचे आतील बनियनला डिजीटल व्हाईस रेकॉर्डर चालू करून पंच श्री. देशमुख यांचेसह सापळा कारवाईकरीता लोकसेवक श्री. संदीप यांचे बृहन्मुंबई महानगरपालिका, अे वॉर्ड, फोर्ट, मुंबई येथील कार्यालयात पाठविले. माझे पाठोपाठ पोलीस पथक काहि अंतर ठेवून होते. मी लोकसेवक श्री. संदीप यांच्या कार्यालयात गेलो असता लोकसेवक श्री. संदीप मिळुन आले. लोकसेवक हे जेवत असल्याने त्यांनी अंगलीमुद्रेने त्यांनी ते बसलेल्या टेबलाच्या खालील उजव्या ड्रॉव्हर मध्ये पैशाचे पाकीट ठेवण्यास सांगितले. लोकसेवक यांनी सांगितल्याप्रमाणे मी माझेकडील ॲथ्रासीन पावडर लावलेली पांढऱ्या रंगाचा लिफाफा ज्यामध्ये लाचेची रक्कमेचे रू. ३५,०००/- ( रू. ५०० दराच्या ७० भारतीय चलनी नोटा ) ठेवली होती ती लोकसेवक यांच्या टेबलाच्या खालील उजव्या ड्रॉव्हर मध्ये ठेवली.

त्यानंतर मी त्यांचे कार्यालयातून बाहेर येवुन पोलीस पथकास लागलीच पुर्वनियोजीत उजवा हात वर करून अंगठयाने थम दाखवुन इशारा केला. त्यावेळी लागलीच पोलीसांनी लोकसेवक श्री. संदीप यांस रू.३५,०००/- लाचेच्या रकमेसह रंगेहात पकडले.

Scanned with CamScanner

सदर वेळी पोलिसांनी त्या लोकसेवकास त्याचे नाव विचारले असता त्याने त्याचे संपुर्ण नाव श्री. संदीप ज्ञानदेव पन्हाळकर वय ३९ वर्षे धंदा - नोकरी, कामगार ( नेमणुक - सहा. अभियंता (जलकामे) ओ - विभाग, जलमापक विभाग व जलदेयके विभाग, ६ वा मजला बृहन्मुंबई महानगरपालिका, शहिद भगतसिंग रोड, फोर्ट, मुंबई ४०० ००१ तसेच रा.ठि. रू.क्र.१०/ओ, महेश को.ऑप.ही.सोसायटी, प्रभात नगर, काजुपाडा पाईप लाईन, जरीमरी जवळ, उमा महेश्वरी मंदिर, कुर्ला पश्चिम, साकीनाका, मुंबई असे असल्याचे पंचांना व पोलीस पथकास सांगितले.

मी मॅनेजर म्हणुन काम करीत असलेल्या मेकर आर्केड को.ऑ.सोसा. लिमि.८५, कफ परेड, कुलाबा, मुंबई येथील शॉपिंग सेंटरमधील लक्ष्मण फास्ट फुड शॉप, वॉटर रीडींग मीटर क्र. ०००२६८ बऱ्याच दिवसापासुन नादुरूस्त असल्यामुळे वॉटर डिपार्टमेंट, ओ वॉर्ड, बृहन्मुंबई महानगरपालिका, फोर्ट, मुंबई येथील कार्यालयातील श्री. संदिप यांनी संबंधित दुकानदाराला पाण्याच्या बिलाची नोटीस काढुन दंडात्मक कारवाई करण्यात येईल व दंडाची रक्कम सुमारे रू. २,००,०००/- एवढी होईल असे सांगुन बिलाची नोटीस व दंडात्मक कारवाई न करण्याकरीता माझेकडे रू. १,००,०००/- रक्कम दयावी लागेल असे सांगितले व माझेकडुन दिनांक १२/०३/२०२१ रोजी तडजोडीअंती रू. ३५,०००/- लाचेची रक्कमेची मागणी करून ती स्वत:साठी स्विकारली म्हणुन माझी त्याचेविरूध्द तक्रार आहे. माझे लोकसेवक श्री. संदीप ज्ञानदेव पन्हाळकर यांचेशी कोणतेही पुर्ववैमनस्य अथवा आर्थिक देवाणघेवाणीचे व्यवहार नाहीत.

माझी वरील फिर्याद मराठीत लॅपटॉपवर टंकलिखीत केली असून ती मी वाचुन पाहीली ती माझे सांगण्याप्रमाणे बरोबर व खरी आहे.

समक्ष,

( अमोल वाघमारे ),
पोलीस निरीक्षक,
लाचलूचपत प्रतिबंधक विभाग, मुंबई

(विजय र. जाधव)

Scanned with CamScanner

8. तक्रारदाराने / फिर्यादीने तक्रार करण्याकरिता झालेल्या विलंबाची कारणे ........ तात्काळ

Reasons for delay in reporting by the Complainant / Informant

9. चोरीस गेलेल्या/अंतर्भूत मालमत्तेचा तपशील (आवश्यकतेनुसार नमुना फॉर्म जोडावा) सविस्तर मजकूर पाठीमागे लिहावे.

Particulars of properties stolen and involved (Attach necessary Proforma) write down details on blank back page.

..........................................................................................

10. (a) चोरीस गेलेल्या / अंतर्भूत मालमत्तेचे एकूण मूल्य ..........................................

Total Value of properties stolen / involved

(b) चोरीची मिळालेली मालमत्ता (Recovered Properties)

11. अकस्मात मृत्यू / अपघाती मृत्यू असल्यास त्याचा क्रमांक ..........................................

Unnatural / Accidental Death Case No., if any

12. पहिल्या खबरीची थोडक्यात हकिगत (आवश्यक असल्यास स्वतंत्र कागद जोडावा) सविस्तर पाठीमागील कोऱ्या पानावर लिहावे.

First Information brief contents (Attach separate sheet, if required) : Detail write down back blank page.

यातील नमूद तारीख, वेळी व ठिकाणी यातील आरोपी संदिप ज्ञानदेव पखाळकर, यांनी तक्रारदार (मॅनेजर) यांचे सोसायटीच्या एका दुकानाचा वॉटर रिडींग मीटर लावल्याच्या दिवसापासून नादुरुस्त असल्यामुळे संबंधित दुकानदाराला पाण्याच्या बिलाची नोटीस काढून दंडात्मक कारवाई न करण्याकरिता रु 9,00,000/- लाचेची मागणी करून पडताळणी दरम्यान तडजोडीअंती रु 35,000/- लाचेची मागणी करून वैध पारिश्रमिकाखेरीज स्वतःच्या - फायद्याकरिता तेवढी रक्कम रु. 35000/- स्वीकारताना त्यांना रंगेहाथ पकडले म्हणून त्यांचे - - विरोधात भ्रष्टाचार प्रतिबंध अधि. कलम 7 अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला.

13. केलेली कार्यवाही – 1. वरील फिर्यादीवरून कॉलम नं. 2 मधील कलमांप्रमाणे गुन्हा दाखल करून तपासावर घेतला, तपास करण्याचे आदेश दिले त्या तपासिक अंमलदाराचे नाव व हुद्दा :

अमोल वाघमारे, पोलीस निरीक्षक

2. तपास नाकारण्यात आला त्याचे कारण,

..........................................................................................

3. दुसऱ्या पोलीस ठाण्याकडे वर्ग करण्यात आला. पोलीस स्टेशन ................, जिल्हा ..............., राज्य ...............

Action taken : Since the above information reveals Commission of offence (s) u/s as mentioned at Item No. 2 :

(1) Registered the case and took up the Investigation or Directed (Name of I.O.)................ Rank.............. No............... to take up the Investigation or

(2) Refused Investigation due to.............................................. (3) Transferred to P. S. ..............................................
District.............................................. on point of jurisdiction.

तक्रारदाराने / फिर्यादीने फिर्याद वाचून पाहिली. फिर्याद बरोबर लिहिली असल्याचे पाहून / वाचून / ऐकून बरोबर नोंदविली असल्याचे त्याने मान्य केले व त्याची एक प्रत त्यास विनामूल्य देण्यात आली.

F.I.R. read over to the Complainant / Informant, admitted to be correctly recorded and a copy given to the Complainant / Informant, free of cost.

(R.O.A.C.)

(विजय र. जाधव)

14. तक्रारदाराची सही व अंगठा
Signature and Thumb impression
of the Complainant / Informant.

पोलीस ठाणे प्रभारी अधिकाऱ्याची सही.
Signature of Officer in-charge, Police Station
संपूर्ण नाव Name ...... अमोल वाघमारे
पदनाम Rank ...... पोलीस निरीक्षक
तपासिक अं. चा कोड क्र. ..........
Posting लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, मुंबई
Code No. of I. O. ..............................

15. 1. न्यायालयास सादर केल्याची तारीख..................
1. Date and time of submitted to the Court.

| | | | | |
|---|---|---|---|---|
| प्रत, | 2. फिर्यादी, | 3. पोलीस अधीक्षक (संगणक), | 4. तपासिक अंमलदार, | 5. स्थळ प्रत. |
| Copy to | 2. Complainant, | 3. Supdt. of Police (Computer), | 4. Inv. Officer, | 5. Office Copy. |

Attachment to item 7 of **First Information Report**

Scanned with CamScanner